आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र – दुपारी ३.०० वाजता
२३ सप्टेंबर २०२२ – शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- बीड जिल्ह्यातल्या आष्टी ते अहमदनगर या ६५ किलोमीटर रेल्वेमार्गाचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे शुभारंभ
- शिवाजी पार्कवर दसरा मेळाव्याच्या परवानगीसाठी शिवसेनेनं दाखल केलेल्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरु
- नवी दिल्लीतल्या आकाशवाणी भवनात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या निवडक भाषणांच्या पुस्तकाचं प्रकाशन
- आजच्या आंतरराष्ट्रीय संकेत भाषा दिनानिमित्त दिव्यांगांसंबंधित संस्थांमधे विविध कार्यक्रमांचं आयोजन

**आणि**

- भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातला दुसरा टी-ट्वेंटी क्रिकेट सामना नागपूरात होणार

**<><><><><>**

बीड जिल्ह्यातल्या आष्टी ते अहमदनगर या ६५ किलोमीटर रेल्वेमार्गाचं लोकार्पण आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज दूरदृश्य प्रणालीद्वारे झालं. मराठवाड्यातला हा बहुप्रतिक्षित रेल्वे प्रकल्प पूर्णत्वास जाऊ शकला, त्याबद्दल मध्य रेल्वेच्या सर्व कर्मचारी आणि अधिकाऱ्यांचे मुख्यमंत्र्यांनी आभार मानले.

या मार्गावरच्या पहिल्या प्रवासी रेल्वेला केंद्रीय रेल्वेराज्यमंत्री रावसाहेब दानवे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतल्या ‘प्रगती’ योजनेत अहमदनगर-बीड-परळी हा रेल्वे मार्ग २६१ किलो मीटरच्या अहमदनगर-बीड-परळी या नवीन ब्रॉडगेज

मार्ग प्रकल्पाचा एक भाग आहे. यात केंद्र सरकार आणि राज्य सरकारचा प्रत्येकी ५० टक्के खर्चाचा वाटा आहे. बीडच्या खासदार प्रीतम मुंडे, माजी मंत्री पंकजा मुंडे, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

जगाला भेडसावणाऱ्या समस्यांचं शाश्वत स्वरूपात निराकरण करण्यात नवभारत जगाचं नेतृत्व करत आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. गुजरातमध्ये एकता नगर इथं आयोजित केलेल्या सर्व राज्यांच्या पर्यावरण मंत्र्यांच्या राष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन आज त्यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे झालं, त्यावेळी ते बोलत होते.

आंतरराष्ट्रीय सौर आघाडीपासून पर्यावरणास्नेही जीवनशैलीचा पुरस्कार करणाऱ्या 'लाइफ मूव्हमेंट' या जागतिक उपक्रमापर्यंत भारत सर्वात पुढे आहे, असं ते म्हणाले. नवीन भारत, नवीन दृष्टिकोन आणि नव्या विचारांच्या साहाय्यानं झेप घेत आहे, भारत आज एक झपाट्यानं विकसित होणारी अर्थव्यवस्था असून पर्यावरणाचं रक्षण करण्यासाठी आपण सातत्यानं प्रयत्न करत आहोत, पर्यावरण रक्षण ही वैयक्तिक नाही तर सामूहिक जबाबदारी असल्याचं ते म्हणाले. भारताच्या वनक्षेत्रात वाढ झाली असून पाणथळ जागांची संख्याही वाढली आहे, गेल्या काही वर्षांत गिर मधले सिंह, वाघ, हत्ती, एकशिंगी गेंडा आणि बिबट्या यांची संख्या वाढली आहे. भारतात चित्यांचं झालेलं स्वागत म्हणजे भारताच्या आदरातिथ्याचं उदाहरण आहे, असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. सर्व राज्यांनी पर्यावरण संवर्धनासाठीच्या सर्वोत्तम पद्धती जाणून घ्याव्यात आणि देशभरात त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन कालपासून महाराष्ट्रातल्या बारामती लोकसभा मतदार संघाच्या दौऱ्यावर आहेत. भारतीय जनता पार्टीच्या लोकसभा प्रवास योजनेअंतर्गत आयोजित या दौऱ्यात आज त्यांनी पुरंदर तालुक्याला भेट दिली. विकासाचा लाभ समाजातल्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतल्या आकांक्षी जिल्हा योजनेचं उद्दिष्ट आहे, मात्र बारामतीचा विकास पक्षपाती पद्धतीनं सुरु असून भाजपाला समर्थन देणाऱ्या इथल्या नागरिकांना याचा अनुभव येत आहे, अशी टीका त्यांनी यावेळी केली. घराणेशाहीचं समर्थन करणाऱ्या आणि भिन्न विचारधारा असलेल्यांमध्ये भेदभाव करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसचा राष्ट्रवादी बाणा यातून दिसून येत नाही, असं त्या म्हणाल्या.

सीतारामन यांनी पुरंदर तालुक्यातल्या जेजुरी इथल्या खंडोबा मंदिरात जाऊन दर्शन घेतलं तसंच पुरंदरमधल्या पंचायत प्रतिनिधींशी स्थानिक प्रश्नांवर संवाद साधला. त्यानंतर त्यांनी मोरगाव इथल्या प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन आयुष्मान भारत योजनेच्या लाभार्थ्यांची देखील भेट घेतली.

**<><><><><>**

शिवाजी पार्कवर दसरा मेळावा घेण्यासाठी आपल्यालाच परवानगी मिळावी यासाठी शिवसेनेने दाखल केलेल्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरु झाली आहे. कालही या याचिकेवर सुनावणी झाली होती. मात्र, शिवसेनेच्या वकीलांनी केलेल्या विनंतीनंतर ही सुनावणी एक दिवसासाठी तहकूब करण्यात आली होती. शिवाजी पार्कवर दसरा मेळावा घ्यायची परवानगी मिळावी असा अर्ज शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे तसंच शिंदे गटानं मुंबई महापालिकेकडे दाखल केला होता. महापालिकेनं कायदा आणि सुव्यवस्थेचे कारण देत दोघांना परवानगी नाकारली. यावर शिवसेनेनं मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

<><><><><>

भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेचा शिंदे गट यापुढे सर्व निवडणुका एकत्रित लढवणार असल्याचं भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं आहे. ते आज औरंगाबाद इथं वार्ताहरांशी बोलत होते. पक्षातर्फे येत्या काळात राबवण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची त्यांनी यावेळी माहिती दिली.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या निवडक भाषणांचं संकलन आज नवी दिल्लीतल्या आकाशवाणी भवनात प्रकाशित झालं. 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास-प्रधानमंत्री नरेंद मोदी के भाषण' असं या पुस्तकाचं नाव असून हे हिंदी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमधून प्रकाशित  होत आहे. या समारंभाला केरळचे राज्यपाल अरिफ मोहम्मद, माजी उपराष्ट्रपती एम वेंकय्या नायडू, केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग ठाकूर आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या पुस्तकात प्रधानमंत्र्यांनी मे  २०१९ पासून मे २०२० पर्यंत केलेल्या ८६ भाषणांचा समावेश आहे. आत्मनिर्भर भारत, कोविड  विरुद्धचा लढा, परराष्ट्र व्यवहारातील भारताची बदलती भूमिका, जय किसान, इत्यादी १० विषयांमध्ये ही भाषण विभागली असून, नूतन भारताच्या नागरिकांच्या आशा आकांक्षांना जनसहभागाच्या माध्यमातून पूर्ण करण्याचं प्रधानमंत्र्यांचं स्वप्न या पुस्तकातून दर्शवलं आहे.

<><><><><>

पीएफआय, अर्थात पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया संघटनेशी संबंधित आस्थापनांवर एनआयए अर्थात, राष्ट्रीय तपास संस्थेच्या नेतृत्वाखाली काल  देशभर राबवलेल्या छापेमारीत १०६ जणांना अटक करण्यात आली. 'ऑपरेशन मिड नाईट' नावाच्या या मोहिमेत  मालेगावमध्ये एनआयए आणि एटीएस अर्थात, दहशतवाद

विरोधी पथकानं संयुक्तपणे राबवलेल्या छापेमारीत पीएफआय संघटनेचा जिल्हाध्यक्ष सैफुर रहमान याच्यासह ५ जणांना अटक केली. जिल्हा आणि सत्र न्यायालयानं त्यांना १२ दिवसांची एटीएस कोठडी दिली.

**<><><><><>**

संयुक्त राष्ट्रांनी आजचा दिवस आंतरराष्ट्रीय सांकेतिक भाषा दिन म्हणून जाहीर केला आहे. 'सर्वांना जोडणारी संकेत भाषा' ही या वर्षीची संकल्पना आहे. देशभरातील दिव्यांगजन सक्षमीकरण विभाग, मूकबधीर दिव्यांगांसाठी असलेली विद्यालयं यांच्या अंतर्गत असणाऱ्या सर्व राष्ट्रीय संस्थांमध्ये हा दिन साजरा करण्यासाठी अधिकाधिक लोकसहभागासह विविध उपक्रम राबवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री प्रतिमा भौमिक, शिक्षण राज्यमंत्री अन्नपूर्णा देवी, अपंग व्यक्तींच्या सक्षमीकरण विभागाचे सचिव आणि इतर अनेक मान्यवर आज नवी दिल्लीत संकेत भाषा दिनाच्या सोहळ्यात सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

क्षयरुग्णांना पोषक आहार देण्यासाठीच्या निक्षय मित्र उपक्रमांतर्गत, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी पेठ तालुक्याचं पालकत्व स्वीकारलं आहे. नाशिक जिल्ह्यात निक्षय मित्र झालेल्या त्या पहिल्या मानकरी ठरल्या आहेत. पोषण आहार पुरवण्यासाठी जिल्ह्यात आतापर्यंत १७ निक्षय मित्रांची नोंदणी झाली असून त्यांच्या मदतीनं ३५० उपचाराधीन क्षयरुग्णांच्या पोषण आहाराची व्यवस्था झाली आहे. जिल्ह्यात क्षयरोगाचे १ हजार ८९८ उपचाराधिन रुग्ण आहेत, उर्वरित रुग्णांच्या पोषण आहारासाठी जिल्हा प्रशासन निक्षय मित्रांच्या शोधात आहे.

**<><><><><>**

देशव्यापी कोविड प्रतिबंधक लसीकरण मोहिमेत आज सकाळपासून ८ लाखापेक्षा जास्त नागरिकांचं लसीकरण झालं. त्यामुळे आतापर्यंत लाभार्थ्यांना दिलेल्या मात्रांची एकूण संख्या २१७ कोटी ३४ लाखाच्या वर गेली आहे. त्यात १९ कोटी ९८ लाखापेक्षा जास्त लाभार्थ्यांनी खबरदारीची लसमात्रा घेतली आहे.

राज्यात आज सकाळपासून २७ हजारापेक्षा जास्त नागरिकांचं लसीकरण झालं. राज्यात आत्तापर्यंत लाभार्थ्यांना दिलेल्या मात्रांची एकूण संख्या १७ कोटी ६९ लाखाच्या वर गेली आहे. त्यात ८९ लाख ८२ हजारापेक्षा जास्त नागरिकांनी खबरदारीची लसमात्रा घेतली आहे.

<><><><>

राज्यात कोविड १९ च्या उपचाराधीन रुग्णांची संख्या ४ हजाराच्या खाली आली असून, कोरोनामुक्तीचा दरही किंचीत वाढला आहे.

राज्यात काल ५५० नव्या रुग्णांची नोंद झाली. ७४० रुग्ण कोरोनामुक्त झाले, तर ३ रुग्णांचा मृत्यू झाला. सध्या राज्यात ३ हजार ८५७ रुग्णांवर उपचार सुरु आहेत. राज्यात रुग्ण बरे होण्याचा दर ९८ पूर्णांक १३ शतांश टक्के, तर मृत्यूदर १ पूर्णांक ८२ शतांश टक्के आहे.

<><><><>

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातला दुसरा टी-ट्वेंटी क्रिकेट सामना आज नागपूर इथं विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर होणार आहे. आज संध्याकाळी सात वाजता हा सामना सुरु होईल. मंगळवारी मोहाली इथं झालेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारतानं पाच गडी राखून मात करत या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

<><><><>

पंचायती राज मंत्रालयाच्या वतीने, "ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासाच्या ध्येयाचं स्थानीकीकरण" या अंतर्गत "स्वच्छ, हरित आणि जल समृद्ध गाव" या संकल्पनांवर आधारित सरपंचांच्या राष्ट्रीय कार्यशाळेचं उद्घाटन काल चिंचवड इथं केंद्रीय पंचायती राज राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या हस्ते झालं. देशातल्या मोठ्या शहरांप्रमाणेच गावांचाही विकास व्हावा ही केंद्र सरकारची भूमिका असून ग्रामविकासाच्या कार्यात ग्रामपंचायत आणि सरपंचाची भूमिका मोलाची असल्याचं पाटील यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

कोल्हापूरच्या जवाहरनगर- सुभाषनगर परिसरात राष्ट्रीय तपास संस्था आणि दहशतवादविरोधी पथकानं काल मध्यरात्री छापा टाकून एका व्यक्तीला अटक केली. पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया अर्थात, पीएफआय संघटनेचा हस्तक असल्याच्या संशयातून नवी दिल्ली आणि नाशिकमधील पथकाने या संशयिताला ताब्यात घेतल. नाशिकमधल्या न्यायालयानं त्याला १२ दिवसांची पोलिस कोठडी दिली आहे. पीएफआय या संघटनेविरोधात राष्ट्रीय तपास संस्थेसह 'एटीएस'च्या पथकानं काल रात्री एकाचवेळी देशभर छापे टाकले होते.

**<><><><><>**

धुळे जिल्ह्यात महिला या राज्यात सर्वाधिक मद्यपी असल्याचा अहवाल नुकताच राष्ट्रीय कौटूंबिक आरोग्य यंत्रणेनं दिला होता, त्याचा निषेध करत आज राष्ट्रवादी पक्षानं जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर आंदोलन केलं. या अहवालामुळे धुळे जिल्ह्यातल्या सर्वच महिलांचा अपमान झाला असून हा अहवाल कोणत्या माहितीच्या आधारे तयार केला याचा खुलासा झाला पाहिजे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष रणजीत राजे भोसले यांनी केली आहे.

**<><><><><>**

धुळे शहरात गावठीकट्टा बाळगणाऱ्या एका इसमाला आज पोलीसांनी ताब्यात घेतलं आहे. त्याच्याकडून गावठी पिस्तुलासह पाच जीवंत काडतूस असा एकूण २७ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला अशी माहिती आज पोलीस अधिक्षक प्रविणकुमार पाटील यांनी दिली. याप्रकरणी धुळे शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

<><><><><>

रायगड जिल्ह्यात श्रीवर्धन तालुक्यातल्या बोर्ली गावात पोषण अभियान अंतर्गत आज सुदृढ बालक स्पर्धेचे आयोजन केलं होतं. यावेळी पाच वर्षे वयापर्यंतच्या बालकांना प्रोत्साहनपर बक्षिसं देण्यात आली. लहान मुलांना जंक फूड न देता, त्या ऐवजी पोषक आणि चवदार, पदार्थ घरातच बनवून मुलांना खायला देण्याचं आवाहन बोर्ली गावाचे सरपंच डॉ चेतन जावसेन यांनी पालकांना केलं. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी बोर्ली ग्राम पंचायत हद्दीतील अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका, ग्रामपंचायत सदस्य यांनी विशेष प्रयत्न केले.

<><><><><>

गडचिरोली जिल्ह्यात गेल्या महिनाभरापासून रानटी हत्ती शेतात शिरून पिकाचं नुकसान करत असल्याची तक्रार गावकरी करत आहेत. गडचिरोली, आरमोरी आणि देसाईगंज तालुक्यांमध्ये वाघांच्या हल्ल्यांचं प्रमाण वाढलं असून, अनेक नागरिकांचा जीव गेला आहे. अशातच रानटी हत्तींनी धुमाकूळ घातल्यानं शेतकऱ्यांवर दुहेरी संकट ओढवलं आहे. मागच्या वर्षीदेखील हत्तींचा कळप जिल्ह्यात आला होता. दरम्यान नागरिकांनी रानटी हत्तींच्या जवळ जाऊ नये, असं आवाहन वनाधिकाऱ्यांनी केलं आहे.

<><><><><>

पालघर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत नवरात्री उत्सवाच्या निमित्तानं येत्या २६ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर दरम्यान जिल्ह्यात "माता सुरक्षित, तर घर सुरक्षित" हे अभियान राबवणार आहे. १८ वर्षांवरील सर्व महिला, माता आणि गरोदर स्त्रिया यांची आरोग्य तपासणी, रोगाचा प्रतिबंध तसचं उपचारासाठी आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणं हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

<><><><>

पालघर जिल्ह्यातल्या पश्चिम किनारपट्टी भागांमध्ये सध्या स्थलांतरित पक्ष्यांच्या आगमनाला सुरुवात झाली आहे. थंडीच्या मोसमाची चाहूल लागताच हे परदेशी पक्षी जिल्ह्यातल्या विविध किनारपट्टी भागांत दिसून येतात. हजारो किलोमीटरचा प्रवास करत हे पक्षी पालघरच्या पश्चिम किनारपट्टीच्या भागांमध्ये विश्रांतीसाठी वास्तव्य करत असतात. सध्या हे परदेशी पाहुणे जिल्ह्यातल्या चिंचणी समुद्रकिनारी दिसून येत आहेत. पालघर जिल्ह्यातल्या किनारपट्टी आणि खाडी भागांत या स्थलांतरीत पक्ष्यांना मुबलक प्रमाणात अन्न उपलब्ध होत असल्यानं हे पक्षी या भागात काही काळ विश्रांती घेत आपल्या पुढील प्रवासाला सुरुवात करतात.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या रविवारी ‘मन कि बात’ या कार्यक्रमातून देशाच्या जनतेशी संवाद साधणार आहेत. हा कार्यक्रम रविवारी सकाळी ११ वाजता आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरून प्रसारित होणार असून हा या कार्यक्रमाचा त्र्यांणवावा भाग आहे. ए आय आर न्यूज, डी डी न्यूज, प्रधानमंत्री कार्यालय तसंच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या युट्यूब वाहिन्यांवरूनही या कार्यक्रमाचं थेट प्रसारण केलं जाणार आहे. या हिंदी कार्यक्रमानंतर त्याचा प्रादेशिक भाषांमधील अनुवाद आकाशवाणी सादर करेल.

<><><><>